दै. प्रजावाणी दि. 09.04.2020

# नशा आणणाऱ्या ऑनरेक्स या औषधाची बेकायदेशीर विक्री

दै. प्रजावाणी दि. 09.04.2020

## 'स्थागुशा'ने केली ९० हजारांची औषधी जप्त



नांदेड, दि.८: नशेच्या आजारी गेलेले तरुण कधी व्हाईटनर तर कधी 'कोरेक्स'सारख्या साधनांचा वापर करत असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, कोरेक्सवर सरकारने बंदी आणल्यानंतर व्यसनधारी मंडळींनी ऑनरेक्स हे नशा देणारे औषध वापरणे सुरू केले आहे. दरम्यान, सदर औषधाची बेकायदेशीर विक्री होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाल्यानंतर पोलिसांनी शक्तीनगर ते केळीमार्केट दरम्यान एका निनावी टिनपत्र्याच्या दुकानावर धाड टाकून सुमारे ९० हजाराची औषधी जप्त केली. विशेष म्हणजे, सदरचे औषध विकणाऱ्या दुकानदाराकडे कोणतेही लायसन्स नव्हते. त्याही उपर म्हणजे, ही औषधे विकली जात असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला नव्हती हे न उलगडणारे कोडे ठरले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार राजेश्वर संगनवार हे बेकायदेशीररीत्या नशा येणाऱ्या औषधाची विक्री करत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. शक्तीनगर ते केळी मार्केट रोड दरम्यान असलेल्या एका टिनशेडच्या दुकानात पोलिसांनी धाड टाकली असता, औषधाचा मोठा साठा आढळून आला. औषधी विक्री संबंधातील कागदपत्रे व परवान्याचा तपास केला असता,



संगनवार यांच्याकडे कुठलेही कागदपत्र आढळून आले नाहीत. या वेळी दुकानाची झाडाझडती घेतली असता, ऑनरेक्स, रेक्सकॉफ या औषधासोबतच झोपेच्या गोळ्या व लैंगिक शक्ती वाढविणाऱ्या गोळ्या पोलिसांना आढळून आल्या. याची विचारणा केली असता, दुकानदार काहीच सांगण्यास तयार नव्हता.

या धाडीत पोलिसांनी ऑनरेक्सच्या ७३३ बाटल्या तसेच रेक्सकॉफच्या नऊ ,बाटल्या अशा एकूण ७२४ बाटल्या जप्त केल्या. सर्व औषधांची मिळून सुमारे ९० हजाराचा माल

पान ३ वर